# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 February 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- पेट प्लास्टिक बाटल्यांचा पुनर्वापर करण्यासाठी राज्यातल्या नऊ शहरांमधे महा-आर-पेट मोहीम- छत्रपती संभाजीनगर आणि बीडचा समावेश
- राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर- महाराष्ट्रातल्या सात जागांचा अंतर्भाव
- मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्याला आजपासून प्रारंभ
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन

आणि

- टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा नेदरलँड्सवर १७ धावांनी विजय

****

पेट प्लास्टिक बाटल्यांचा पुनर्वापर करण्यासाठी राज्यातल्या नऊ शहरांमधे महा-आर-पेट ही मोहीम राबवण्यात येणार आहे. मुंबई हवामान परिषदेत राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत याबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.  त्यानुसार हिंदुस्तान कोकाकोला बेव्हरेजेस ही कंपनी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि पालघर इथं ही मोहीम राबवणार आहे. या मोहिमेअंतर्गत प्लास्टिक कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट याविषयी जनजागृती करण्यात येईल. प्लास्टिक गोळा करण्यासाठी दुकानं, उपाहारगृहं, आणि इतर सार्वजनिक ठिकाणी संकलनकेंद्र सुरु केली जातील, तसंच शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि बिगरसरकारी संस्थांच्या समन्वयातून ही मोहीम राबवली जाणार आहे.

****

जगाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांचं निराकरण कृत्रिम बुद्धीमत्तेच्या माध्यमातून करण्यावर भारत लक्ष केंद्रीत करत असल्याचं, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत इंडिया एआय समिटमध्ये संशोधन परिसंवादाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. आरोग्य, कृषी आणि हवामान बदल या क्षेत्रात उद्भवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी एआय तंत्रज्ञानाला प्रधान्य दिलं जात असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या रिक्त होणाऱ्या जागांमध्ये महाराष्ट्रातल्या सात जागांचा समावेश असून, शरद पवार, डॉ. भागवत कराड, डॉ. फौजिया खान, रजनी पाटील आणि रामदास आठवले आदी सदस्यांचा कार्यकाळ दोन एप्रिल रोजी पूर्ण होत आहे. या निवडणुकीची २६ फेब्रुवारी रोजी अधिसूचना जारी केली जाणार असून, येत्या १६ मार्च ला मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख पाच मार्च असेल, अर्जांची छाननी सहा मार्च रोजी होईल आणि नऊ मार्च पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

****

राज्यात मुस्लिम समाजासाठी शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण लागू करणाऱ्या अध्यादेशाची मुदत संपली आहे. तत्कालीन काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारनं मराठा समाजासाठी १६ टक्के आणि मुस्लिम समाजासाठी पाच टक्के आरक्षणाची तरतूद करणारा अध्यादेश काढला होता. त्या अध्यादेशाचं कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे तो मुदत संपल्यावर रद्द झाला, त्यामुळे त्याबाबतचा शासननिर्णय आणि परिपत्रक रद्दबातल झाल्याचं शासन निणर्यात म्हटलं आहे.

****

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दोन लाख विद्यार्थ्यांना आता टप्याटप्यानं आपत्ती व्यवस्थापनाचं प्रशिक्षण मिळणार आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी ही माहिती दिली. यासंदर्भात ‘अनिरुद्धाज् अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट’ आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय यांच्यात काल मुंबई सामंजस्य करार करण्यात आला.

****

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला उद्या शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे. राज्यभरातील सोळा लाखाहून अधिक विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. या परीक्षेत शंभर टक्के कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी तयारी करण्यात आली आहे. १८ मार्च पर्यंत दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सुरू असलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षण विभागाने परीक्षेची पारदर्शकता अबाधित राहावी यासाठी १६० दक्षता पथकांची नियुक्ती केली आहे. जिल्हाभर दररोज सरासरी सहा ते सात परीक्षा केंद्रांवर प्रत्यक्ष भेट देऊन संपूर्ण प्रक्रियेचं चित्रीकरण करण्यात येत आहे

****

मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्याला आजपासून प्रारंभ झाला. काल सायंकाळी चंद्रदर्शनानंतर ही घोषणा करण्यात आली. भल्या पहाटे सेहरी करून मुस्लिम बांधव आज पहिला उपवास पाळत आहेत. या महिन्यात तीस दिवसांच्या या उपवासासह कुराण ग्रंथाच्या पवित्र पठणाचं आयोजनही करण्यात येतं.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज साजरी होत आहे. त्यानिमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात मिरवणुका, मशाल रॅली यासह व्याख्यानं आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. काल संध्याकाळपासून शहरातले अनेक मार्ग वाहनांसाठी बंद करण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेत जवळपास चारशे विद्यार्थ्यांच्या सहभागातून कार्ड बोर्ड वापर करून छत्रपती शिवरायांची भव्य कलाकृती साकारण्यात आली. मानवी साखळीच्या माध्यमातून शिवाजी महाराजांची भव्य प्रतिमा साकारण्यात आली.

परभणी इथं शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला जिजाऊ महिला ब्रिगेडच्या वतीने आणि नागरिकांच्या वतीने मशाल फेरी काढण्यात आली.

****

बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीनंही शिवजयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. शाहिरी लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम आज होणार आहे.

****

धाराशिव इथं 'My Bharat (Mera Yuva Bharat)' मेगा पदयात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आज तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलातून पदयात्रेला प्रारंभ होत आहे. धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने शाहिरी पोवाडा कार्यक्रम घेण्यात आला. नगरपालिकेच्या श्री शिवाजी महाराज नाट्यगृहात आज सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे.

****

लातूर शहरात मध्यरात्री १२ वाजता पाळणा उत्सव पार पडला. आतषबाजी आणि आकर्षक विद्युत रोषणाईमुळे छत्रपती शिवाजी महाराज परिसर शिवमय झाला होता. दरम्यान, लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'गौरव गाथा शिवरायांची' या कार्यक्रमांतर्गत महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग साकारण्यात आले. 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या कार्यक्रमात शाहिरी पोवाडे आणि स्फूर्तीगीतांचं सादरीकरण करण्यात आलं.

****

शिवजयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय – घाटी, तसंच लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातला बाह्यरुग्ण विभाग आज बंद राहणार आहे. मात्र आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सिंधुदुर्गात सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, राजकोट आणि सर्जेकोट या चार किल्ल्यांच्या सखोल अभ्यासासाठी मुंबई विद्यापीठाअंतर्गत स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने ५० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली. हे अध्यासन केंद्र मालवण इथं स्थापन होणार आहे.

****

क्रिकेट

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने नेदरलँड्सवर १७ धावांनी विजय मिळवला. काल अहमदाबाद इथं झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत निर्धारित षटकात १९३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल आलेला नेदरलँड्स संघाने २० षटकात सात गड्यांच्या मोबदल्यात १७६ धावांपर्यंत मजल मारली.

वरुण चक्रवर्तीने तीन, तर शिवम दुबे ने दोन गडी बाद केले. ३१ चेंडुत ६६ धावा करणारा आणि दोन बळी घेणारा शिवम दुबे सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. अ गटातच काल श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं नामिबियावर १०२ धावांनी विजय मिळवला, तर ड गटात दिल्लीत झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं संयुक्त अरब अमिरातीचा ६ गडी राखून पराभव केला.

****

२८ फेब्रुवारीपासून गोवा इथं विझी क्रिकेट ट्रॉफी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या आंतरविभागीय विद्यापीठ एकदिवसीय पुरुष क्रिकेट स्पर्धेसाठी पश्चिम विभागीय विद्यापीठ क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला. या संघात बीडचा क्रिकेटपटू अमित राठोड याची फलंदाज म्हणून निवड झाली आहे.

****

नव्या भारताची निर्मिती करणाऱ्या संविधानाचं संवर्धन आणि प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीय नागरिकाची असल्याचं, संविधान अभ्यासक डॉ अनंत राऊत यांनी म्हटलं आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातल्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग आणि विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत डॉ राऊत बोलत होते. संविधानाच्या विविध पैलूंवर डॉ राऊत यांनी प्रकाश टाकला. ते म्हणाले...

**बाईट– डॉ अनंत राऊत**

****

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ इथं महाशिवरात्री निमित्त रथोत्सव काल पार पडला. सुमारे अडीच लाख भाविक यात सहभागी झाले होते.

****

बीड नगर परिषदेने गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीपट्टीचा भरणा न केल्यामुळे पाटबंधारे विभागाने शहराचा मुख्य पाणीपुरवठा कालपासून बंद केला आहे. नगर परिषद प्रशासनाकडे जानेवारी २०२६ अखेरपर्यंत तब्बल ४९७ लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ही कारवाई करण्यात आली.

****

लातूर इथं विद्यार्थी हत्याप्रकरणी न्यायालयाने आरोपींना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसरात गेल्या

१६ तारखेला दोन गटातल्या हाणामारीत ही घटना घडली, त्या ठिकाणाहून पोलिसांनी आरोपींची काल धिंड काढली.

****